SHIKSHANGANGA

SHIKSHANGANGA



# 2022-23

# CULTURE REPORT

## (संस्कृती अहवाल)

**PREPARED BY**

Samrat Pawar

For Internal Circulation

# शिक्षणगंगा बद्दल थोडक्यात परंतु महत्वाचं

स्वामी विवेकानंदजींच्या स्वप्नातील भारत देश बनवण्यासाठी सक्षम युवनिर्माण हे एकमात्र साधन आहे असं शिक्षणगंगा मानते ,आणि अशाच उच्च अभिक्षमता,व्यक्तिमत्व आणि चरित्राच्या युवकांना विकसित करून स्थानिक शिक्षण आणि सामाजिक व्यवस्थेत सुधार आणावा या विचारावर संस्थेचा पाया आहे.

समाजविकास कार्य करताना सूत्रबद्ध नियोजन, दूरदृष्टी ,शिस्त,गुणवत्ता,उत्तम संस्थासंस्कृती, सर्वसमावेशक नीतिमूल्ये संस्था वातावरणात असणे प्रचंड आवश्यक आहे ,आणि कार्यकर्त्यांचे नेतृत्व विकसन आणि चरित्र समाजविकास आपल्या कार्यास गती आणि अर्थपूर्णता देतं, म्हणूनच शिक्षणगंगा युवानेतृत्व,वयक्तिक-व्यावसायिक चरित्र,संस्कृती आणि गुणवत्ता या बाबींवर प्रधानदृष्टी ठेवते .

देश निर्माण हे दृष्टीस असाध्य परंतु साध्य असं कार्य आहे , एक संस्था जेंव्हा हे कार्य करत असेल तर हे थोडंसं आव्हानात्मक जाणवेल आपल्याला ,कारण भारत देशाचा 2021 या वर्षी जर विचार केला तर 140.76 कोटी एवढी लोकसंख्या आहे, 37.4 कोटी युवक सध्या देशाची संपत्ती म्हणून उपलब्द आहे .
शिक्षणव्यवस्थेचा विचार केला तर 15,09,126 शाळा (2022 सरासरी) आहे,म्हणजे पंधरा लाखापेक्षाही जास्त शाळा देशात आहेत. ,या शाळांच्या केंद्रीय प्रश्नांचा विचार केला तर खालील समस्या आपल्याला जाणवतील .

1) विद्यार्थी सुरक्षा (वर्गात)
2) कृतियुक्त शिक्षण अभाव
3) सामाजिक-भावनिक शिक्षण अभाव.
4) विद्यार्थी नेतृत्व विकास.
5) गुणवत्तापूर्ण शिक्षक (प्रशिक्षण/अभाव)
6) सकारात्मक वर्गसंस्कृती

गरिबी आणि बेकारी हि देशासमोरील दोन मोठी आव्हाने गुणवत्तापूर्ण शैक्षणिक साधनांनी बऱ्याच अंशी कमी करता येऊ शकते अशी आपली धारणा आहे, प्रत्येक विद्यार्थ्याला सन्मानाचं जीवन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावं हा त्याचा अधिकार आहे,शासन अथवा समाजव्यवस्था हा अधिकार विद्यार्थ्यांना पोहोचवण्यास अक्षम असेल तर शिक्षणगंगा याला आपलं प्रथम कर्तव्य समजते,म्हणूनच शिक्षणगंगा एक संस्था म्हणून अस्तित्वात आहे.

1 मे 2020 रोजी शिक्षणगंगा च्या विचाराने जन्म घेतला व हा दिवस संस्थेचा स्थापना दिवस म्हणून पालन करण्याचा निर्णय तत्कालीन व्यवथापन मंडळाने घेतला,पुढे जुलै 2020 ला संस्था प्रत्यक्षात स्थापन झाली,आणि इतर सहयोगी संस्थांच्या सहकार्याने आपली घोडदौड सुरु झाली ,100 युवकांनी हि संस्था प्रचंड विकसित केली व शेवटी 6 जुलै 2021 रोजी संस्था धर्मदाय आयुक्त पुणे इथे नोंदणीकृत झाली.
बाँबे पब्लिक ट्रस्ट ऍक्ट 1950 आणि सोसायटी रेजिस्ट्रेशन ऍक्ट 1860 या दोन्ही कायद्यांअंतर्गत शिक्षणगंगा फौंडेशन या लीगल नावाने आपल्या संस्थेची नोंदणी झाली आहे.
श्री .सम्राट पवार हे संस्थापक तथा कार्यकारी अध्यक्ष म्हणून नोंदणी निर्वाचित झाले,पुढे त्यांनीच संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची जबाबदारी पूर्ण वेळ सांभाळण्याच्या निर्णय घेतला आणि अद्याप ते सुरु आहे.

संस्थासंस्कृती हा महत्वाचा मुद्दा संस्थेच्या अस्तित्वास कारणीभूत असतो,आणि शिक्षणगंगा हि संस्कृती प्रधान संस्था आहे.

उत्तम संस्थात्मक व मानवतावादी मूल्ये प्रभावीपणे रुजवली जाणे,संस्थेत वावरणाऱ्या प्रत्येक सदस्याची सुरक्षितता जपणे,सर्वांना समाधानकारक शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देणे आणि वेळोवेळी मदत तथा विकास आराखड्यानुसार सर्व सदस्यांना विकासाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात हा उद्देश संस्कृती कार्यालयाचा आहे.


## संस्कृती अहवाल

संस्कृती अहवाल हा वार्षिक अहवाल संस्थासंस्कृती तपासणी आणि कार्यालयीन प्रकाशनासाठी उपलब्ध करून देण्यात येतो .

खालील आठ वेगवेगळ्या मुद्द्यांची वर्षभरातील नोंदीनुसार हा अहवाल निर्माण केला जातो.


- सदस्यांची संस्थेत काळजी
- सदस्यांची संस्थेअंतर्गत सुरक्षा (शारीरिक,मानसिक आणि लैंगिक)
- व्यवस्थापक सोबत संतुष्टी
- संस्थाअंतर्गत नातेसंबंध
- सदस्यांना शिकायला मिळणे
- संस्थेकडून सदस्यांसाठी सुविधा
- एकंदरीत संस्था संस्कृती
- सदस्यांची एकंदरीत संस्थेसोबत समाधानकारकता

## संस्थेत 31 जानेवारी 2023 रोजी 83 कार्यालयीन सदस्य खालीलप्रमाणे सदस्य आहेत




## सदस्यांची संस्थेत काळजी (Care in Organization)

सदस्यांना जपलं जावं त्यांची काळजी घेतली जावी,वेळोवेळी आवश्यक ते साहाय्य त्यांना देऊन त्यांना आनंदी आणि समाधानकारक ठेवणे हे महत्वाचं आहे,कारण कामाव्यतिरिक्त सुद्धा सदस्य हे संस्थेसाठी महत्वाचे आहेत.
सर्व सदस्यांशी झालेला संवाद आणि वेळोवेळी मिळालेल्या अभिप्रायानुसार उत्तम काळजी घेतली जाणे या संदर्भात गुणांकन असे आहे.





## सदस्यांची संस्थेअंतर्गत सुरक्षा (शारीरिक,मानसिक आणि लैंगिक) (Safety- Physical,Mental & Sexual)

संस्थेत काम करताना सुरक्षित जाणवल्यास काम करताना आनंद मिळतो व कार्यकर्त्यांचे मानसिक स्वास्थ्य जपले जाते हि बाब प्रत्यक्षात नियमित अनुभवता आली आम्हाला,आणि आपल्या संस्थेत काम करताना सर्व सदस्यांची शारिरीक सुरक्षितता,मानसिक आयोग्यास पोषक वातावरण निर्मिती ,लैंगिक शोषण प्रतिबंधक धोरण प्रभावी अंमलबजावणी केल्यामुळे यात उत्तम गुणांकन अनुभवण्यास मिळेल.





## व्यवस्थापक सोबत संतुष्टी (Satisfaction with Coordinators)

रिपोर्टींग कॉर्डीनेटर्स हे एका ठराविक कालावधीपर्यंत संबंधित सदस्यांना सहकार्य आणि मार्गदर्शनासाठी तत्पर असतात, सदस्यांकडून त्यांच्या समाधानकारकता आणि पसंती बाबतीत गुणांकन असे.
संस्थेअंतर्गत कार्यस्थळ हे ऑनलाईन,ऑफलाईन व मिश्र अशा प्रकारचे आहेत,या स्वरूपानुसार कमी अधिक प्रमाणात बदल प्रकल्पानुसार आढळले आहे.




## संस्थाअंतर्गत नातेसंबंध (Professional and Personal Relationships within Organization)

वयक्तिक विकासात समाजविकास आहे आणि समाजविकासात राष्ट्रविकास असं शिक्षणगंगा मानते,अशा वयक्तिक विकसित युवाने इतर युवा सदस्य व संस्थेसोबत उत्तम नातेसंबंध तयार करणं शिकून एकमेकांच्या सर्वांगीण विकासासाठी त्या नात्याची जोपासना करावी या संदर्भात हे गुणांकन आहे.




## सदस्यांना शिकायला मिळणे (Personal & Professional Learnings)

शिक्षणगंगा च एक वैशिष्ट्य म्हणजे इथे शिकण्यासाठी उपलब्द असलेल्या संधी.
सदस्य वेगवेगळ्या जबाबदारीत सहभागी असतात ,आणि या जबाबदारीत काम करत असताना वयक्तिक व्यक्तिमत्व विकास,व्यवसायिक कौशल्ये आणि मानवतावादी मूल्यांची रुजवणूक उत्तम प्रकारे इथे होते.
या संदर्भात गुणांकन.





## संस्थेकडून सदस्यांसाठी सुविधा (Offerings From Organization)

संस्थेसाठी जोडला गेलेला सदस्य अतिशय महत्वाचा आहे,कारण जर संस्था एक परिवार असेल तर त्याचा सदस्य हा महत्वाचा आहेच.
संस्थेकडून उत्तम संस्था संस्कृती,सहजसोप्या प्रक्रिया करून सदस्यांसाठी चांगला अनुभव तर तयार केला जातो या व्यतिरिक्त.


- Mentor Institute Training
- Learning Circles
- Monthly Rituals Cum Well Being Spaces
- Councelling Supports
- Classroom Observations & Debriefing COnversations
- Leadership Training Spaces and Camps
- Indian Administration Service Forum
- Monthly Magazine

या सर्व ऑफेरींग बाबतीत गुणांकन असे.





### एकंदरीत संस्था संस्कृती (Overoll Organization Culture)

सर्व सदस्यांच्यामते एकंदरीत संस्थात्मक संस्कृतीस गुणांकन असे कि .




### सदस्यांची एकंदरीत संस्थेसोबत समाधानकारकता (People Satisfaction with Organization)

प्रचंड गुणवत्तेची निवड प्रक्रिया पूर्ण करून प्रशिक्षणास उपस्थित राहणे,गुणवत्तेने प्रशिक्षण पूर्ण करणे आणि एक शिक्षक अधिमित्र म्हणून काही कालावधीसाठी युवक शिक्षणगंगा अंतर्गत विविध प्रकल्पात काम करतात.
त्यांच्यासाठी उत्तम अनुभव तयार करण्यासाठी सर्व व्यवस्थापन मंडळ हे तत्पर असतं,आणि प्रामाणिकपणे सर्व सदस्य योगदान देतात,जास्तीत जास्त युवक हे महाविद्यालयीन विद्यार्थी असतात तरीही सहा महिने ते दीड वर्षापर्यंत युवक जबाबदारीस योगदान देतात ,त्याच्या संस्थेसोबतच्या  एकंदरीत समाधानकारकता साठी त्यांच्याकडून हे गुणांकन.




**महत्वाचे : सर्व माहिती हि संबंधित सदस्यांच्या सोबतच्या विविध संवादातून,विविध सर्वे आणि डेटा ट्रॅकर्स च्या आधाराने दिलेली आहे.**

- संस्कृती कार्यालय,शिक्षणगंगा फौंडेशन